अस्सल सोलापुरी

# सुराज्य

सोलापूर

सोलापूर, पुणे, सांगली, धाराशिव, लातूर, विजयपूर, कलबुर्गी, बिदर, बीड

www.surajyadigital.com । गुरुवार, दि. ९ मे २०२४ । ▸ वर्ष : २२ वे ▸ अंक : २१९ वा ▸ किंमत : ५ रुपये ▸ पाने १२

## — हैदराबादचा लखनौवर वादळी विजय —

**हैदराबाद** : सनरायझर्स हैदराबाद एक्सप्रेस बुधवारी सुसाट धावली. लखनौच्या संघाला हैदराबादने १६५ धावांत रोखले होते. विजयासाठी १६६ धावांचा पाठलाग करताना हैदराबादच्या सलामीवीरांनी तुफानी सुरुवात करून दिली आणि त्यामुळेच हा सामना मोठ्या फरकाने हैदराबादला जिंकता आला. या मोठ्या विजयासह हैदराबादच्या संघाने प्ले ऑफच्या दिशेने मोठे पाऊल टाकले आहे. ट्रेव्हिस हेड आणि अभिषेक शर्मा यांची सलामी यावेळी हैदराबादच्या विजयात सर्वात मोलाची ठरली. ट्रेव्हिस हेडने यावेळी ३० चेंडूंत ८ चौकार आणि आठ षटकारांच्या जोरावर नाबाद ८९ धावा केल्या, तर अभिषेक शर्माने नाबाद २८ चेंडूंत ८ चौकार आणि सहा षटकारांच्या जोरावर हेडला सुरेख साथ दिली. एकही विकेट न गमावता विजय मिळवल्याचे पाहायला मिळाले.

## आजचा सामना

पंजाब किंग्ज
विरुद्ध
रॉयल चॅलेंजर्स बंगळुरु

वेळ : रात्री ७.३० वा. स्थळ : धर्मशाला

# मतदानाच्या अंतिम आकडेवारीत लाखमोलाची वाढ

## दोन्ही मतदारसंघात मतदानाचा टक्का वाढला

सोलापूर/प्रतिनिधी

**सोलापूर आणि माढा लोकसभेसाठी झालेल्या मतदानाची अंतिम आकडेवारी जिल्हाधिकाऱ्यांनी बुधवारी जाहीर केली. सोलापूरसाठी ५९.१९ टक्के तर माढ्यात ६३.६५ टक्के मतदान झाले आहे. दोन्ही मतदारसंघात गतवेळीपेक्षा मतदान जास्त झाले आहे. सोलापुरात आकडेवारी नुसार सर्वाधिक मतदान अक्कलकोट तर माढ्यात सर्वाधिक मतदान माढा विधासनसभा मतदारसंघात झाले आहे. आता दोन्ही मतदारसंघातील नागरिकांना निकालाची प्रतिक्षा लागली आहे.**



सोलापूर आणि माढ्यासाठी मंगळवारी मतदान पार पडले. रात्री जिल्हाधिकाऱ्यांनी सोलापूर लोकसभेसाठी ५७.४६ आणि माढ्यासाठी ५९.८ टक्के मतदान झाल्याचे सांगत यात काही टक्के वाढ होईल, असा अंदाज वर्तवला होता. त्यानुसार सोलापुरात ०.७३ टक्के तर माढ्यात ०.५८ टक्के वाढ झाली. सोलापुरात १२ लाख १ हजार ५८६ तर माढ्यात १२ लाख ६७ हजार ५३० जणांनी मतदानाचा हक्क बजावला. तर माढा लोकसभेसाठी १२ लाख ६७ हजार ५३० जणांनी मतदान केले आहे.

### १ लाखापेक्षा जास्त मते वाढली

गेल्यावेळी सोलापूर लोकसभेसाठी १० लाख ८४ हजार ५१४ जणांनी मतदान केले होते. यंदा त्यात तब्बल १ लाख १७ हजार ७२ मतांची वाढ झाली आहे. माढा लोकसभेसाठी गेल्यावेळी १२ लाख १६ हजार ३१९ जणांनी मतदान केले होते. यंदा त्यात ५१ हजार २११ मतांची वाढ झाली आहे. त्यामुळे ही वाढीव मते कोणला फायद्याची आणि कोणाला तोट्याची याची आकडेमोड दोन्ही पक्षाकडून सुरू आहे.

## सोलापुरात ५९.१९ तर माढ्यात ६३.६५ टक्के मतदान

## सोलापुरात ४ तर माढ्यातील ५ मतदारसंघात दोन लाखांवर मतदान

### माढा : विधानसभानिहाय मतदानाची अंतिम आकडेवारी

- करमाळा : करमाळ्यामध्ये ५५.८४ टक्के म्हणजे १ लाख ७७ हजार ५१६ जणांनी मतदान केले. यामध्ये १ लाख ३४४ पुरूष तर ७७ हजार १६८ महिलांनी मतदान केले.
- माढा : माढा मतदारसंघात ६६.४८ टक्के म्हणजे दोन लाख २४ हजार ४४६ जणांनी आपला मतदानाचा हक्क बजावला. यात १ लाख २५ हजार २४९ पुरूषांनी तर ९९ हजार १९६ महिलांनी मतदान केले.
- सांगोला : सांगोला मतदारसंघात ६४.१० टक्के म्हणजेच २ लाख ३२४ जणांनी मतदान केले. यामध्ये १ लाख ८ हजार १४० पुरूषांनी मतदान केले तर ९२ हजार १८४ महिला मतदारांनी मतदान केले.
- माळशिरस : माळशिरस मतदार संघात ६६.४३ टक्के म्हणजे २ लाख २४ हजार ३३१ जणांनी मतदान केले. यामध्ये १ लाख २२ हजार५५४ पुरूष तर १ लाख १ हजार ५५९ महिलांनी मतदान केले.
- फलटण : फलटणमध्ये ६७.५ टक्के २ लाख २५ हजार ३०४ जणांनी मतदान केले. यामध्ये १ लाख २१ हजार १३ पुरूषांनी तर १ लाख ४ हजार २८५ महिलांनी मतदान केले.
- माण : माण मतदारसंघात ६१.६६ टक्के म्हणजे २ लाख १५ हजार ८०९ जणांनी मतदान केले. यामध्ये १ लाख १२ हजार ७५४ पुरूष तर १ लाख ३ हजार ५४ महिलांनी मतदान केले.

**एकूण १२ लाख ६७ हजार ५३० जणांनी केले मतदान**





### सोलापूर : विधानसभानिहाय मतदानाची अंतिम आकडेवारी

- मोहोळ : मोहोळमध्ये ६३.१५ टक्के म्हणजे २ लाख १ हजार ९६५ जणांनी मतदान केले. यामध्ये १ लाख १३ हजार ५९३ पुरूष तर ८८ हजार ३७२ महिलांनी मतदान केले.
- शहर उत्तर : सोलापूर शहर उत्तरमध्ये ५९.१५ टक्के मध्ये १ लाख ८४ हजार ०६५ जणांनी मतदान केले. ९६ हजार २४१ पुरूष तर ८७ हजार ८०९ महिलांनी मतदान केले.
- शहर मध्य : सोलापूर शहर मध्यमध्ये ५६.५१ टक्के म्हणजे १ लाख ८४ हजार २९ जणांनी मतदान केले. ९५ हजार ३६ पुरूष तर ८८ हजार ९४७ महिलांनी मतदान केले.
- अक्कलकोट : अक्कलकोट मध्ये ५९.१७ टक्के म्हणजे २ लाख १२ हजार ७९० जणांनी मतदानाचा हक्क बजावला. यामध्ये १ लाख १४ हजार २७२ पुरूष तर ९८ हजार ५१२ महिलांनी मतदान केले.
- सोलापूर दक्षिण : सोलापूर दक्षिणमध्ये ५८.२८ टक्के म्हणजे २ लाख ७ हजार ४८६ जणांनी मतदान केले. यामध्ये १ लाख ११ हजार १६० पुरूष तर ९६ हजार ३१९ महिलांनी केले.
- पंढरपूर : पंढरपूरमध्ये ५९.४ म्हणजे २ लाख १२ हजार ५२१ मतदान झाले. यामध्ये १ लाख १४ हजार ७१३ पुरूष तर ९५ हजार २६९ महिला मतदारांनी मतदान केले.

**एकूण १२ लाख १ हजार ५८६ जणांनी केले मतदान**

# गोळ्या लागूनही वृद्ध दरोडेखोरांना भिडला

**नांदेड : एका सेवानिवृत्त कर्मचाऱ्यावर गोळीबार करून ४० हजार रुपये लूट केल्या प्रकरणी पोलिसांनी मुख्य सूत्रधारासह गोळीबार करणाऱ्या इतर दोघांना अटक केली आहे. अटक करत असताना एका आरोपीने पोलिसांवर गोळीबार केला होता, त्याला प्रतिउत्तर देत पोलीस अधिकाऱ्याने देखील आरोपीच्या पायावर गोळी झाडून जखमी केले. हरविंदरसिंघ ढील्लोन, रोहित सतपाल कौडा, सतप्रीतसिंघ सहोता असे अटक करण्यात आलेल्या आरोपीची नावे आहेत.**



यातील एक आरोपी नांदेड तर दोन आरोपी पंजाब राज्यातील रहिवासी आहेत. बेरोजगारीला कंटाळून आणि कमी वेळात भरपूर पैसे कमवण्यासाठी आरोपी हे पंजाबहून नांदेड आले होते, त्यांनी हे कृत्य केल्याचे तपासा दरम्यान समोर आलं आहे.

रविंद्र जोशी (वय ६८) हे भावसार चौक भागातील अष्टविनायक नगर येथील रहिवासी आहेत. ते सेवानिवृत्त कर्मचारी आहेत. मंगळवारी दुपारी ते मालेगाव रोडवरील एस बी आय बँकेत पेन्शनचे पैसे काढण्यासाठी गेले होते. बँकेतून त्यांनी ४० हजार रूपये काढून परत घराकडे परत आले. घराच्या गेट मध्ये जात असतानाच अचानक पाठीमागून दुचाकिवरुन आलेल्या दोघांनी त्यांना अडवले. त्यांच्याकडील पैसे लुटण्याचा हल्लेखोरांनी प्रयत्न केला. यावेळी रवींद्र जोशी यांनी प्रतिकार देखील केला. यावेळी जोशी आणि आरोपींची झटापट झाली. आरोपींनी बंदुकीच्या ३ गोळया यावेळी त्यांच्यावर झाडल्या. यात त्यांच्या हाताला एक आणि पायाला एक गोळी लागली. गोळी लागून ही जोशी यांनी हल्लेखोरांचा प्रतिकार केला. हल्लेखोराच्या हातात मोठा चाकू होता. त्यातील एका हल्लेखोराला जोशी यांनी ढकलून खाली पाडले. त्यांनतर तो हल्लेखोर आपल्या साथीदाराच्या स्कूटीवर बसून पसार झाला. जोशी यांचे ४० हजार रुपये घेऊन हल्लेखोर पळाले. या प्रकरणी भाग्यनगर पोलीस ठाण्यात रात्री उशिरा गुन्हा दाखल करण्यात आला.

# दुचाकीवरच शिक्षकाचा हृदयविकाराने मृत्यू



**अक्कलकोट** : अक्कलकोट तालुक्यातील हंजगी येथील जिवाजीराव शिक्षण प्रसारक मंडळ संचलित वाल्मीकी बालक प्राथमिक आश्रम शाळा हंजगी येथील सहशिक्षक चनबसप्पा तुकशेट्टी (वय ४७) यांना दुचाकिवरून जाताना हृदयविकारचा झटका आला, त्याचत त्यांचे निधन झाले ही घटना अक्कलकोट येथे बुधवारी घडली.

चनबसप्पा हे सकाळी घरी अंघोळ करुन समता नगर येथून अक्कलकोट शहरात जात असताना चालत्या मोटार सायकलवरच त्यांना हृदयविकाराचा तीव्र झटका आल्याने ते गाडीवरून खाली कोसळले. तेव्हा परिसरातील लोक त्यांना गाडीत घालून श्री स्वामी समर्थ हॉस्पीटल येथे घेऊन जात असताना वाटेतच त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्या या दुर्दैवी मृत्यूमुळे त्यांच्या राहत्या गावी किणीवाडी गावावर तसेच अक्कलकोट शहर परिसरात हळहळ व्यक्त होत आहे.त्यांच्या पश्चात आई, पत्नी, एक मुलगा, एक मुलगी, तीन भाऊ असा परिवार आहे.

## मतदान केंद्राजवळ मारहाण

**करमाळा** : झरे (ता.करमाळा) येथे मतदान केंद्राजवळ मारहाण झाल्याने सोमनाथ शेटेबा जाधव (वय ३८ रा.झरे) हे जखमी झाले. ही घटना मंगळवारी घडली. सोमनाथ जाधव हे मतदान केंद्राजवळ चौकशीसाठी गेले होते. त्यावेळी रामभाऊ दिलीप घाडगे याने मारहाण केली. उपचारासाठी रुग्णालयात दाखल केले.

# 'कत्तल की रात'च्या वाटपाला दणका

## सोलापूर, सांगोल्यात घटना; दोन्ही ठिकाणी दोघांवर गुन्हा

सोलापूर/प्रतिनिधी

आपल्या पसंतीच्या उमेदवाराला मतदान करण्यासाठी मतदारांना पैशांची लालूच देण्याच्या घटना सोलापूर व सांगोला या ठिकाणी घडल्या. दोन्ही ठिकाणी पोलिसांनी दोघांवर गुन्हा दाखल केला आहे.



माजी नगरसेवकासह दोघांवर गुन्हा : सलगर वस्ती पोलिस ठाण्याच्या हद्दीत असलेल्या सुतकर शाळेजवळ मतदानादिवशी आपल्या पसंतीच्या उमेदवारास मत देण्यासाठी एक चिठ्ठी व ५०० रूपये देणाऱ्या माजी नगरसेवक नरसिंग सायबन्ना कोळी (वय ३१ रा. रेणूकानगर हौसिंग सोसायटी, सैफुल) व माजी नगरसेवकाचा मुलगा चेतन नागेश गायकवाड (वय २५ रा. सेटलमेंट फ्रि कॉलनी नं.३) या दोघांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

या प्रकरणी पोलिस कॉन्स्टेबल सागर बोरामणीकर यांनी सलगरवस्ती पोलिस ठाण्यात फिर्याद दाखल केली आहे. यात म्हटले आहे की, दि.७ मे रोजी मतदाना दिवशी ५ वाजण्याच्या सुमारास सुतकर शाळेजवळ माजी नगरसेवकासह दोघे उभे राहुन मतदानास जाणाऱ्या लोकांना एक चिठ्ठी व ५०० रूपये रोख देवून आपल्या पसंतीच्या उमेदवारास मतदान करण्यास सांगत असल्याचे आढळून आले. या फिर्यादीवरून नरसिंग कोळी व चेतन गायकवाड या दोघांविरूध्द गुन्हा दाखल झाला आहे. याचा पुढील तपास फौजदार पवार हे करत आहेत.

पैसे वाटपाचे गुन्हे दाखल झाल्याने शहर आणि जिल्ह्यात खळबळ उडाली. दोन्ही उमेदवारांच्या कार्यकर्त्यांच्या सजगतेमुळेच प्रकार उघडकीस आला असावा अशी चर्चा राजकीय वर्तुळात सुरु आहे.



### सांगोल्यात दोघांना रंगेहाथ पकडले

सांगोला शहरातील कोष्टी गल्ली येथे लोकांना मतदान करण्याकरिता पैसे वाटप करीत असताना आनंद शिवलिंग घोंगडे व सचिन चंद्रकांत दौडे यास फिरते भरारी तपास पथकाने रंगेहाथ पकडले. दोघे सांगोला शहरातील कोष्टी गल्ली येथे मतदारांना मतदान करण्याकरिता पैसे वाटप करीत असताना तपास पथकाने त्यांना रंगेहाथ पकडून त्यांच्याकडे तपासणी केली. यावेळी त्यांच्याकडे पाच स्लिप व ४०७० रुपये रोख रक्कम मिळून आले. ही कारवाई भरारी पथकातील पोलीस हेडकॉन्स्टेबल रोहित रवींद्र गाडे त्यांच्यासोबत शहाजान शेख, पोलीस कॉन्स्टेबल बिराजदार, देसाई, व्हिडिओग्राफर वाघमारे, चालक नितीन जगताप यांनी केली. गुन्ह्याचा तपास सांगोला पोलीस करीत आहे



**सुट्टीला गावी जाण्यासाठी : सध्या सुटीचा कालावधी आहे तसेच मतदानही झाले आहे. त्यामुळे परगावी जाण्यासाठी सोलापूरकरांनी बसस्थानकावर गर्दी होत आहे.**

# महापालिका नोकर भरतीमधील नियुक्तीपत्रे जूनमध्ये मिळणार : उपायुक्त

**सोलापूर** : सोलापूर महापालिकेच्या नोकर भरतीचा निकाल दोन महिन्यांपूर्वीच जाहीर झाला. यातील केमिस्ट, फिल्टर इन्स्पेक्टर या पदांवरील तिघांना नियुक्तीपत्रे दिली होती.

उर्वरित पदांसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना जूनमध्ये नियुक्तीपत्रे मिळतील, असे उपायुक्त आशिष लोकरे यांनी बुधवारी सांगितले. महापालिकेने विविध ३१ संवर्गातील ३०२ पदांच्या भरतीसाठी फेब्रुवारी महिन्यात परीक्षा घेतली होती. गुणवत्ता यादी जाहीर झाली आहे. लोकसभा निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे नियुक्तीपत्रे प्रदान करण्यात आलेली नाहीत. या पदांसाठी पात्र ठरलेले उमेदवार नियुक्तीच्या प्रतिक्षेत आहेत. उपायुक्त लोकरे म्हणाले, ही संपूर्ण प्रक्रिया ऑनलाइन आहे. आचारसंहितेमुळे नियुक्तीपत्रे देण्यात आलेली नाही. सर्व प्रक्रिया जूनमध्ये पूर्ण होईल. उमेदवारांना नियुक्तीपत्रे दिली जातील.



## तिसरा डोळा

– प्रकाश पोरे




आता मंत्र्यांच्या नोकरांच्या घराकडे पाहिले पाहिजे !

कल्याण
116-83-670

मुंबई
670-32-200

## उच्च न्यायालयाचा राज्य सरकारला दिलासा; औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचं नाव

# छत्रपती संभाजीनगर आणि धाराशिवच

मुंबई/प्रतिनिधी

**राज्य सरकारने औरंगाबाद आणि उस्मानाबाद जिल्ह्याचे नामकरण करण्याचा निर्णय घेतला होता. औरंगाबादचे छत्रपती संभाजीनगर आणि उस्मानाबादचे नामकरण धाराशिव करण्यात आले होते. या निर्णयाला उच्च न्यायालयात आव्हान दिले गेले. मात्र राज्य सरकारचा हा निर्णय मुंबई उच्च न्यायालयाने वैध ठरविला आहे. राज्य सरकारचा हा निर्णय बेकायदेशीर नाही, असे उच्च न्यायालयाने म्हटले. राज्य सरकारने घेतलेल्या निर्णयाला अनेक याचिकांद्वारे आव्हान देण्यात आले होते. न्यायाधीश देवेंद्र उपाध्याय आणि न्यायाधीश आरीफ एस. डॉक्टर यांच्या खंडपीठाने या सर्व याचिका फेटाळल्या.**

उद्धव ठाकरे यांच्या नेतृत्वाखालील महाविकास आघाडी सरकारच्या कारकिर्दीतील अखेरच्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत जून २०२२ मध्ये औरंगाबादचे संभाजीनगर, उस्मानाबादचे धाराशिव आणि नवी मुंबई विमानतळाला दि. बा. पाटील असे नामकरण करण्याचा निर्णय झाला होता. पण ही प्रक्रिया नियमबाह्य असल्याचे कारण पुढे करीत मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या मंत्रिमंडळाने नामांतराच्या निर्णयाला स्थगिती दिली.

त्यानंतर पुढच्याच महिन्यात औरंगाबादचे पुन्हा नामांतर करण्यात आले. यावेळी संभाजीनगर नावापुढे छत्रपती असे नामविशेष जोडून छत्रपती संभाजीनगर, असे नामकरण करण्यात आले. जुलै २०२२ मध्ये शिंदे-



फडणवीस सरकारने घेतलेल्या निर्णयाला फेब्रुवारी २०२३ मध्ये केंद्र सरकारने मंजुरी दिली. उपमुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी त्यावेळी एक्स वर पोस्ट टाकून हा निर्णय घेतल्याबद्दल केंद्र सरकारचे आभार मानले होते. औरंगाबाद शहराचे संभाजीनगर असे नामांतर करण्याचा निर्णय शिवसेना-भाजप युती सरकारच्या काळात १९९७ मध्ये झाला होता. सारी प्रक्रिया पूर्ण करून अधिसूचना जारी करण्यात आली होती. पण राज्य सरकारच्या त्या निर्णयाला न्यायालयात आव्हान देण्यात आले. प्रकरण सर्वोच्च न्यायालयात गेले होते. राज्यात १९९९ मध्ये सत्ताबदल झाल्यावर औरंगाबादच्या नामांतराची अधिसूचना तत्कालीन विलासराव देशमुख सरकारने मागे घेतली होती. परिणामी गेली २५ वर्षे निर्णय होऊनही प्रत्यक्ष संभाजीनगर असे नामकरण झाले नव्हते.

विधिमंडळाच्या दोन्ही सभागृहांमध्ये नामकरणाचा ठराव सरकारला मांडावा लागतो. त्यावर नामकरणाचा ठराव साध्या बहुमताने मंजूर करावा लागतो. विधिमंडळाने नामकरणाचा ठराव संमत केल्यावर हा ठराव केंद्रीय गृहमंत्रालयाकडे सादर केला जातो. साऱ्या यंत्रणांनी आक्षेप न घेतल्यास नामकरणास मान्यता मिळते.

## शासकीय वसतीगृहातील महिलेचा मृत्यू

सोलापूर/प्रतिनिधी

शहरातील शासकीय रेणुकामाता महिला वस्तीगृहात राहणाऱ्या परवीन शेख (वय ३०) ही महिला तिच्या खोलीत मृतावस्थेत आढळली. आज बुधवारी सकाळी १० वाजेच्या सुमारास ती वस्तीगृहातील खोलीत बेशुद्ध अवस्थेत आढळली.

तिला दुपारी १२ वाजेच्या सुमारास वस्तीगृहातील स्टाफ नर्स यांनी शासकीय रुग्णालयात दाखल केले होते.डॉक्टरांनी तिला मृत जाहीर केले. परवीन शेख हीला फिटस् चा आजार होता .गेल्या दोन वर्षापासून तिच्यावर औषध उपचार चालू होते. अशी नोंद विजापूर नाका पोलिसात झाली आहे.